# ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद,सांगली

- <u>**विभागाकडील नाविन्यपूर्ण योजना**</u>

    - ➢ महात्मा गांधी  राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
    - ➢ पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना
    - ➢ संपूर्ण स्वच्छता अभियान

- <u>**विभागाकडील राबविल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या योजना**</u>

    - ❖ ग्रामपंचायतीची कर वसुली
    - ❖ पाणीपट्टी वसुली
    - ❖ १३ वा वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर अनुदान योजना
    - ❖ संगणकीय ग्रामिण महाराष्ट्र (संग्राम)
    - ❖ जिल्हा वार्षिक योजना
        - ▪ ग्रामपंचायतींना जनसुविधासाठी विशेष अनुदान
        - ▪ मोठया ग्रामपंचायतींना नागरी सुविधासाठी विशेष अनुदान (विद्युतीकरणसह)
        - ▪ यात्रा स्थळांचा विकास कार्यक्रम (क वर्ग तिर्थक्षेत्र योजना)

- <u>**योजनेचे निकष, अटी व शर्ती, योजनेचे लाभार्थी**</u>

१)  महात्मा गांधी राष्ट्रीय  ग्रामीण रोजगार हमी योजना

→ एकूण कामांपैकी किमान ५०% खर्चाची कामे ग्रामपंचायत मार्फत

→ग्रामसभेकडून कामांची निवड, अंमलबजावणी, पर्यवेक्षण

→केंद्र शासनाकडून जाहिर होणाऱ्या किमान मजुरी दराप्रमाणे मात्र केलेल्या कामाच्या मोजमापाप्रमाणे मजुरी

→योजनेअंतर्गत जलसंधारणांची, भु-विकास, पुरनियंत्रण, वनीकरण, वृक्षलागवड, बारमाही व पांधण रस्ते, वैयक्तीक लाभाच्या योजना इ. कामे केली जातात.

→अकुशल, कुशल कामाचे प्रमाण ६०:४० असे आहे.

→ग्रामिण भागातिल व्यक्तीला काम मागणी केल्यास अकुलशल काम पुरविणे कायदयाने बंधनकारक मात्र त्यासाठी मजुर नोंदणी, जॉबकार्ड आवश्यक

→ मजुर नोंदणी, कुटुंबपत्रकाचे वाटप, फोटो व जॉबकार्ड या सर्व गोष्टी कायदयाने बंधनकारक

→ बँक किंवा पोस्ट खात्यामार्फत १५ दिवसात मजुरी वाटप

→ नोंदणीकृत मजुराने काम मागणी केल्यास १५ दिवसात काम देऊ न शकल्यास बेरोजगार भत्ता देय.

→ किमान १०० दिवस केंद्रीय निधीतून अकुशल रोजगाराची हमी

→ कामावर कंत्राटदार लावण्यास बंदी

→ कामाप्रमाणे दाम स्त्री पुरुष समान

→ मजुरी दर १४५ रुपये हजरी

→ मजुरांसाठी सोयी सवलती

→ अपंगत्व वा मृत्यु आल्यास रुपये ५०,०००/- पर्यंत सानुग्रह अनुदान

## २) पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना.

→ या कार्यक्रमात आपल्या गावातील पर्यावरण संवर्धन जतन व संरक्षण साधून गांवाअंतर्गत उच्च प्रतीच्या भौतिक, मुलभुत सुविधा निर्मितीसाठी नियोजन आणि अंमजलबजावणी.

→ या योजनेअंतर्गत योजनेचे निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना सुरुवातीस तीन वर्षात खालील प्रमाणे निधी कामगिरीच्या सातत्यानुसार उपलब्ध करुन देण्यात येईल.

**लोकसंख्या व निधी तपशिल** **बक्षिस र.रु.**

✓ १,००० लोकसंख्या पर्यंतच्या ग्रापं (दर वर्षी २ लाख) -प्रत्येकी रु.६ लाख

✓ १,००१ ते २,००० लोकसंख्या ग्रापं (दर वर्षी ३ लाख) -प्रत्येकी रु.९ लाख

✓ २,००१ ते ५,००० लोकसंख्या ग्रापं (दर वर्षी ४ लाख) -प्रत्येकी रु.१२ लाख

- ✓ ५,००१ ते ७,००० लोकसंख्या ग्रापं (दर वर्षी ५ लाख) -प्रत्येकी रु.१५ लाख
- ✓ ७,००१ ते १०,००० लोकसंख्या ग्रापं (दर वर्षी ८ लाख) -प्रत्येकी रु.२४ लाख
- ✓ १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रापं (दर वर्षी १० लाख) - प्रत्येकी रु. ३० लाख
- ✓ यापैकी तालुका मुख्यालय ग्राप दरवर्षी (दर वर्षी १२ लाख) - रु. ३६ लाख

**→ग्रामपंचायतीना अनुदान वाटपाचे निकष**

| लाभार्थी | निकष | बाब |
|---|---|---|
| ग्रामपंचायत | अ) वृक्षलागवड<br>ब) वृक्षसंवर्धन | ग्रामपंचायत हद्दीत लोकसंक्ष्योच्या इतकी झाडे लावून जगविणे. ५०% पेक्षा वृक्षांच्या जगण्याच्या प्रमाणात अनुदान |
| | हगणदारी मुक्त | ६०% पहिल्यावर्षी, ७५%दुसऱ्या वर्षी, तिसऱ्या वर्षी १००% |
| | कर वसुली (घरपट्टी, पाणी पट्टी) | ६०% पहिल्यावर्षी, ८०%दुसऱ्या वर्षी, तिसऱ्या वर्षी ९०% |
| | प्लास्टीक बंदी | १००% पूर्ण |
| | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान | पहिल्यावर्षी सहभाग घेणे, ५०%दुसऱ्या वर्षी, तिसऱ्या वर्षी ६०% |
| | यशवंत पंचायत राज अभियान | पहिल्यावर्षी सहभाग घेणे, ५०%दुसऱ्या वर्षी, तिसऱ्या वर्षी ६०% गुण |
| | अपारंपारिक ऊर्जा | दुसऱ्या वर्षी ५०% स्ट्रीट लाईट (सौर, सीफएल, एलईडी) १ % कुटुंबाकडे वायुगॅस, तिसऱ्या वर्षी १००% स्ट्रीट लाईट (सौर, सीफएल, एलईडी) २ % कुटुंबाकडे वायुगॅस, १० % घरात सौरउर्जावर ( सीफएल, एलईडी) |
| | घनकचरा व्यवस्थापन | दुसऱ्या वर्षी १००% संपूर्ण संकलन व ५० % कचऱ्यापासून खतनिर्मिती, , तिसऱ्या वर्षी १००% कचऱ्यापासून खतनिर्मिती |

| | | |
|---|---|---|
| | सांडपाणी | दुसऱ्या वर्षी ५०% शास्त्रशुध्द व्यवस्थापन, तिसऱ्या वर्षी ७५% शास्त्रशुध्द व्यवस्थापन |

## ३) संपूर्ण स्वच्छता अभियान

- →१०० टक्के शौचालय बांधकाम असणे व त्याचा वापर १०० टक्के असेणे, वैयक्तिक स्वच्छता १०० टक्के ठेवणे
- →परिसर स्वच्छता ठेवणे
- →सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन करणे
- →शाळा अंगणवाडीमध्ये शौचालयाची सोय करणे
- →स्वच्छ पाणी स्वच्छ हवा उपलब्ध करुन देणे
- →वैयक्तिक शौचालय - सर्व कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा उपलब्ध करणे, बी.पी.एल. कुटुंबाना प्रोत्साहन अनुदान
- →सार्वजनिक स्वच्छतागृह - मोठी गावे, आठवडी बाजार व वर्दळीच्या ठिकाणी स्वच्छतागृहे उपलब्ध करणे
- →शाळा स्वच्छतागृह - मुलामुलींसाठी प्रत्येक शाळेत स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा निर्माण करणे
- →अंगणवाडी स्वच्छतागृह - लहान मुलांसाठी सोयीस्कर निर्मिती
- →प्रोत्साहनपर निधीची रक्कम लोकसंख्येवर आधारित आहे आणि त्याचे निकष पुढीलप्रमाणे आहेत.

| लोकसंख्या | बक्षिस र.रु. |
|---|---|
| ✓ १,००० पेक्षा कमी लोकसंख्या | - रु.०.५० लाख |
| ✓ १,००० ते २,००० लोकसंख्या | - रु.१.०० लाख |
| ✓ २,००० ते ५,००० लोकसंख्या | - रु.२.०० लाख |
| ✓ ५,००० ते १०,००० लोकसंख्या | - रु.४.०० लाख |
| ✓ १०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या | - रु.५.०० लाख |

→**निर्मल ग्राम पुरस्कार**

**पात्रता**

- ✓ ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा याद्वारे १०० टक्के स्वच्छता अभियानाची यशस्विता
- ✓ १०० टक्के घरांसाठी शौचालय सुविधा
- ✓ उघडयावर संडास, पाणी न लागणारी शौचालये आणि डोक्यावरुन मैला वाहून नेणे या प्रथा बंद करणे
- ✓ पर्यावरणातील स्वच्छतेची देखभाल

**<u>निवडीची प्रक्रिया</u>**

- ✓ १०० टक्के हागणदारी मुक्त झालेली ग्रामपंचायत, तालुका व जिल्हयाची निवड राज्य शासन वर नमुद केलेल्या पात्रता शिर्षकामध्ये दिल्याप्रमाणे करते व निवड झाल्यावर राज्य शासनाकडून केंद्र शासनास त्याचा अहवाल पाठविला जाईल.
- ✓ १०० टक्के हागणदारी मुक्त झालेल्या ग्रामपंचायत, तालुका व जिल्हा यांचा मुल्यमापनासाठी केंद्र सरकार स्वतंत्रपणे विविध विषयातील तज्ञांची नेमणूक करते.

## ४) <u>ग्रामपंचायतीची कर वसुली</u>

→ मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२४ (१) अन्वये व महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० अन्वये गावांच्या सीमेतील इमारती (मग त्या कृषी आकारणीस अधिन असोत किंवा नसोत) व (ज्या कृषी आकारणीस अधिन नाहीत अशा) जमिनी यावरील कर उपरोक्त नियमामध्ये निश्चित केलेले किमान व कमाल दरास व अशा माफीस अधिन राहून ग्रामपंचायतीला कर बसविण्याचा अधिकार आहे.

## ५) <u>पाणीपट्टी वसुली</u>

→ मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १२४ (१० खं) (८) (१२) व (१३) अन्वये जेव्हा ग्रामपंचायत पाण्याची सोय करील तेव्हाच या खंडाखाली सामान्य पाणीपट्टीचा कर बसविता येतो. जेव्हा पंचायत नळाचे पाणी घरोघरी देईल त्यावेळी

असे पाण्याचे नळ घेणाराकडून पंचायतीस खंड १२ खाली खास पाणीपट्टी घेण्याचा अधिकार आहे

## ६) १३ वा वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर अनुदान योजना

→ १३ वा वित्त आयोग (ग्रामपंचायत स्तर) या योजनेतुन जनरल बेसींग ग्रॅट जनरल परफॉम्स ग्रॅट या सदराखाली एकूण मंजुर निधीतुन ७० टक्के रक्कम ग्रामपंचायत स्तरासाठी मंजुर होवून सदरचा निधी सांगली जिल्हातील ७०५ ग्रामपंचायतीना त्याचे १३ वा वित्त आयोग ग्रापं स्तर अनुदान बचत खातेवर सदरची रक्कम जमा करणेत येते सदरचे निधीतून शासननिर्णयानुसार खालीलप्रमाणे कामे घेता येतात.

- **घेण्यात येणारी कामे**
  - ✓ ग्रामपंचायतीच्या क्षेत्राअंतर्गत निर्माण झालेल्या विविध मत्ताची देखभाल व दुरुस्ती करणे
  - ✓ गावांतर्गत गटारे व रस्ते बांधकाम (मुरुमीकरण, खडीकरण, डांबरीकरण व सिमेंट कॉंक्रटीकरण) तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती करणे. सदर कामे करताना शासनाने विहित केलेल्या मानकाचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. एकच काम वेगवेगळ्या योजनाच्या निधीतून एकाचवेळी हाती घेण्यात येणार नाही. व निधिचा अपव्यय-दुरुपयोग होणार नाह ीयाची खबरदारी घ्यावी.
  - ✓ ग्रामपंचायत कार्यालय / ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती (हे बांधकाम बी.आर.जी.एफ. चा निधी व एम.आर.जी.एस. अंतर्गत राजीव गांधी भवनासोबत एकत्रितपणे विहित प्राधिकाऱ्याची मंजुरी घेवुन करता येईल)
  - ✓ दहन भुमी / दफन भुमीची देखभाल व दुरुस्ती
  - ✓ आरोग्य,ग्रामस्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाशी निकडीत कामे (उदा. पोर्टेबल व व्हेईकल माऊंटेड फॉगिंग मशिन, घंटागाडी, ट्रॅक्टर ट्रॉली)
  - ✓ घनकचरा प्रकीयेसाठी पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरुन शास्त्रीय पद्धतीने कमी खर्चाचे प्रकल्प हाती घेणे
  - ✓ पर्यावरण संतुलित समृद्ध ग्रामयोजने संबंधि ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या दि. १८ ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयात अंतर्भूत असलेलया विविध बाबीसाठी पुरक निधी म्हणून या निधीचा वापर करणे

✓ ग्रामसभा / ग्रामपंचायत सभा यांच्या दृकश्राव्य चित्रिकरणाची व्यवस्था करण्यासाठी आवश्यक उपकरणे, साधने घेणे व त्यासाठी आवश्यक तंत्रबळ उपलब्ध करुन घेणे

## ७) <u>संगणकिय ग्रामिण महाराष्ट्र (संग्राम)</u>

→ जिल्हापरिषद स्तरावर संग्राम कक्ष स्थापन करणेत आला असून इंटरनेट जोडणी देखिल करणेत आलेली आहे. महाऑनलईन मार्फत ५ संगणक परिचालकामार्फत प्रकल्पाअंतर्गत येणा-या सॉफ्टवेअरचे काम चालू आहे.

→ पंचायत समितीस्तरावर देखिल संग्राम कक्ष स्थापन करणेत आला असून इंटरनेट जोडणी देखिल करणेत आलेली आहे.

→ संग्राम प्रकल्पाकरीता महाराष्ट्र शासन व टी.सी.एस. यांची संयुक्त कंपनी म्हणून महाऑनलाईन या कंपनीमार्फत मनुष्यबळ पुरविण्यात आलेले आहे. पुरविण्यात आलेल्या संगणक परिचालकामार्फत प्रकल्पाअंतर्गत येणा-या सॉफ्टवेअरचे काम चालू आहे.

→ ग्रामपंचायत स्तरावर एकूण ७०४ ग्रामपंचायींपैकी ७०४ ठिकाणी संगणक प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी सर्व संगणकांचे इन्स्टॉलेशन पूर्ण करणेत आलेले आहे. ६८० ठीकाणी इंटरनेट सुविधा उपलब्ध झालेली आहे, त्यापैकी ४५२ ठिकाणी BSNL Broadband सुविधा आहे व इतर ठिकाणी नेटसेटर वापरुन काम केले जाते. जिल्ह्यामधील २४ ग्रामपंचायतीमधे कोणत्याही प्रकारची इंटरनेट सेवा उपलब्ध होऊ शकत नाही.

→ जि.प. स्तरावर एकूण आवश्यक ६पैकी ६ , प.स. स्तरावर एकूण आवश्यक ३० पैकी ३० व ग्रा. प. स्तरावर एकूण ६०२ आवश्यक मनुष्यबळापैकी ६०१ इतके मनुष्यबळ तसेच १३ हार्डवेअर इंजिनियर महाऑनलाईन मार्फत उपलब्ध झालेले आहे.

→ प्रिया सॉफ्टवेअर- प्रिया सॉफ्टवेअरचे काम जिल्हा परिषद, पंचायत समिती स्तर व ग्रामपंचायत स्तरावर सन २०१३-१४ या वर्षाचे लेखे भरुन वर्ष क्लोज करणेत आलेले आहेत तसेच सन २०१४-१५ या वर्षाचे जि.प. व प.स स्तरावरील जून २०१४ अखेरचे लेखे भरुन पूर्ण करणेत आलेले आहेत. ग्रामपंचायत स्तरावर एकूण ७०४ पैकी ६५७ ग्रामपंचायतींचे जून २०१४ अखेरचे लेखे भरुन पुर्ण करणेत आले आहेत.

→**इतर सॉफ्टवेअर-** १) नॅशनल पंचायत पोर्टल - जिल्हापरिषद स्तरावर भरणेत आलेले आहे. तसेच पंचायत समिती स्तरावरील माहीती एकत्रित करुन भरणेचे काम सुरु आहे.

२) नॅशनल पंचायत डिरेक्टरी - जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे नॅशनल पंचायत डिरेक्टरी मध्ये मॅपिंग (Mapping)) करुन घेणेत आलेले आहे.

३) नॅशनल पंचायत प्रोफायलर- जिल्हापरिषद स्तरावर व पंचायत समिती स्तरावरील माहीती भरणेत आलेले आहे. तसेच सर्व ग्रामपंचायतींचे प्रोफायलरची माहीती भरणेत आलेली आहे.

४) प्लॅन प्लस- जिल्हा परिषद , पंचायत समिती व ग्रामपंचायतस्तरावरील सर्व प्लॅनची माहिती प्लॅन प्लस या आज्ञावलीमध्ये भरणेत आलेली आहे.

५) ॲक्शन सॉफ्ट - जिल्हा परिषद , पंचायत समिती व ग्रामपंचायतस्तरावरील सर्व वर्क क्रिएशनची माहिति ॲक्शन सॉफ्ट या आज्ञावलीमध्ये भरणेत आलेली आहे.

→ जिल्हा परिषद स्तरावर नविन निविदेचे काम ई-टेंडरींग पध्दतीने सुरु आहे तसेच पंचायत समिती स्तर व ग्रामपंचायत स्तरावर ई-टेंडरींगसाठी लागणारे डिजिटल सिग्नेचर करुन घेणेचे काम प्रगतीपथावर आहे.

## ८) ग्रामपंचायतींना जनसुविधासाठी विशेष अनुदान

→ग्रामीण भागात दहन / दफन भूमीची व्यवस्था करणे, त्या सुस्थितीत ठेवण् व त्याचे नियमन वन /करणे यासाठी स्मशानभूमीवर घ्यावयाची कामे

→ग्रामपंचायत भवन / कार्यालय इ. बाबतची कामे घेणेची आहेत.

→यामध्ये एका ग्रामपंचायतीला जास्तीत जास्त १०.०० लाख निधी जिल्हा नियोजन समिती मार्फत प्राप्त होतो. त्यानुसार सदरची योजना जिल्हास्तरीय व १०० टक्के अनुदानावरील आहे.

→सदर योजने अंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा समावेश गांव नियोजन आराखडयात असणे आवश्यक आहे.

→या योजनेअंतर्गत प्रत्येक कामास प्रशासकिय मान्यता ग्रामसभेच्या सहमतीनंतर ग्रामपंचायत देईल

→या योजनेंतर्गत कामास तांत्रिक मान्यता सक्षम अधिकाऱ्या मार्फत देणेची आहे.

→सदर योजनेअंतर्गत कामाची निवड जिल्हा नियोजन समितीमार्फत करणेची आहे.

→जागेचा ठराव व देखभाल दुरुस्तीबाबत ग्रामपंचायतीचा ठराव

→योजनेचा आढावा व संनियंत्रण अधिकारी हे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. राहतील.

## ९) मोठया ग्रामपंचायतींना नागरी सुविधासाठी विशेष अनुदान (विद्युतीकरणसह)

→ मोठया ग्रामपंचायतीचा आर्थिक सामाजिक सांस्कृतिक औद्योगिक कृषि औद्योगिक आणि वाणिज्य विकास करणे व तेथील राहणीमान दर्जेदार होणेसाठी व शहराच्या तोडीच्या मुलभुत सुविधा व रोजगार संधी उपलब्ध करुन देणे व नियोजनबद्ध विकास करणे.

→महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शा.नि.क्र. व्हीपीएम-२६१०/ प्र.क्र. १२९/पंरा-४, दि. १६ सप्टें. २०१० व शुद्धीपत्रक दि. २० ऑक्टोबर २०११ नुसार ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या ५००० च्यावर आहे व सदर ग्रापंने पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेमध्ये भाग घेतलेला आहे अशा ग्रापंना खालील सुविधांवर ग्रापंने घेतलेल्या कामाच्या ९० टक्के निधी जिल्हा नियोजन समिती व १० टक्के निधी ग्रापंने घालणेचा आहे. एका ग्रापंला एका वर्षात खालील सुविधावर सर्व कामासाठी जास्तीत जास्त र.रु. ५०.०० लाखापर्यंत देणेचा आहे.

→ **वरील शासन निर्णयात समाविष्ठ असलेल्या खालीलप्रमाणे कामे घेता येतात.**

१) नियोजनबद्ध विकास - १० लाख, २) बाजारपेठ विकास - २५ लाख, ३) सार्वजनिक दिवाबत्ती सोय - १० लाख, ४) बागबगीचे उद्याने तयार करणे - १५ लाख ५) अभ्यास केंद्र - ७ लाख ६) गावांअंतर्गत रस्ते तयार करणे ७) सांडपाणी व्यवस्थापनासाठी भूमीगत नाल्याचे बांधकाम करणे अशी कामे घेणेची आहेत.

→**प्रस्ताव मागणी व योजनेचे निकष**

सदर योजनेअंतर्गत मा. मंत्रीमहोदय, मा. खासदार, मा. आमदार, मा. जिल्हा नियोजन समितीचे सदस्य यांची मागणी विचारांत घेवून ज्या ग्रामपंचायती १० टक्के रक्कम स्वत:च्या उत्पन्नातून घालणेस तयार आहेत अशा ग्रामपंचायतीचे संबंधित सर्व तालुक्याचे गटविकास अधिकारी यांचेकडून प्रस्ताव मागणी केले जातात. १) पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेमध्ये निवड केलेल्या ग्रामपंचायतीचा समावेश असलेबाबत सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र २) १०० टक्के विकास आराखडयास ग्रामसभेच्या मंजुरीचा ठराव व प्रशासकीय मान्यतेचा ठराव ३) १० टक्के रक्कम ग्रामपंचायतीने

घालणेबाबतचा ठराव व दुरुस्ती देखभालीचा ग्रामपंचायतीचा ठराव व जागेचा उतारा
४) या योजनेअंतर्गत कामास तांत्रिक मान्यता सक्षम अधिकाऱ्यामार्फत देणेची आहे.
५) सदर योजनेअंतर्गत कामाची निवड जिल्हा नियोजन समितीमार्फत करणेची आहे.

→ वरील मा. महोदयांनी सुचविलेल्या सर्व कामांची यादी तयार करुन जिल्हा नियोजन समितकडे पाठविली जाते त्यानुसार मा. अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती तथा पालकमंत्री महोदय यांचेमार्फत कामांची निवड केली जाते.

१०) **<u>यात्रा स्थळांचा विकास कार्यक्रम (क वर्ग तिर्थक्षेत्र योजना)</u>**

→ क वर्गातील तिर्थक्षेत्र / यात्रास्थळे यांची निवड जिल्हा नियोजन व विकास मंडळ करते.

→ प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून तरतुद करुन तिर्थक्षेत्र / यात्रास्थळांना भेट देणाऱ्या यात्रेकरु / प्रवासींची संख्या वार्षिक एक लाख किंवा अधिक आहे अशा तिर्थक्षेत्र यात्रास्थळांना प्राधान्य.

→ तिर्थक्षेत्र विकासाविषयक कामाचे स्वच्छतागृह, स्नानगृह, पाणीपुरवठा, भक्तनिवास, तिर्थक्षेत्र परिसरातील पथदिवे, वाहनतळ, घाट बांधकाम व संरक्षण भिंत इ. कामांचा समावेश